महाराष्ट्र शासन
वन विभाग

# विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालय

रामबाग फॉरेस्ट कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर - 442401 (म.रा.)

दुरध्वनी क्र. 07172-270448 फॅक्स नं. 07172-270448 E-mail :- dfochandrapur@gmail.com

**क्रमांक** :- कक्ष-14/सर्व्हे/जमीन/ 1645 **दिनांक** :- 01-01-2021

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
अउदा प्रकल्प विभाग, म.रा.वि.पा.कं. मर्या.,
बंगाली कॅम्प, चंद्रपूर.

**विषय** :- वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत मुल ते सिकॉम 132 के.व्ही. द्विपथ विद्युत वाहीनीकरीता वनक्षेत्र वळते करण्याबाबत.

**संदर्भ** :- 1. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक 630, दिनांक 16/06/2020.
2. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/448, दिनांक 25/06/2020.
3. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/553, दिनांक 07/07/2020.
4. दिनांक 19/10/2020 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने.
5. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-14/सर्व्हे/जमीन/1143, दिनांक 20/10/2020.
6. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक 1636, दिनांक 15/12/2020.

आपले संदर्भिय पत्र क्रमांक 6 अन्वये विषयांकीत कामाकरीता 43.4405 हे. वनक्षेत्र वळतीकरणाचा सुधारीत प्रस्तावाची एक प्रत प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता प्रस्तावात खालीलप्रमाणे त्रूट्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. 3 रूट दर्शविणारा नकाशा प्रस्तावात जोडण्यांत यावा.
2. Cost Benefit Analysis प्रस्तावात जोडण्यांत यावे.
3. या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 5 अन्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे प्रस्तावित वनक्षेत्राचे मौक्यावर सिमांकन करून त्यातील संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून मौका तपासणी करून झाडोऱ्याची मोजणी करून अहवाल सादर करणेबाबत.
4. Area Statement मध्ये दर्शविलेले वनक्षेत्राचे Legal Status मध्ये सुधारणा करणे व नकाशात Legal Status प्रमाणे रंग भरून नकाशा सादर करावा.
5. Area Statement मधील क्षेत्र निश्चिती वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेसह संयुक्त मौका तपासणीनंतर आलेल्या आकडेवारीनुसार होणार असल्याने क्षेत्र तपासणी तात्काळ करण्यांत यावी.
6. NPV ची रक्कम भरणा करण्यांत येत असल्याचे प्रमाणपत्र जोडण्यांत आलेले नाही.
7. प्रशासकीय मान्यतेची प्रत प्रस्तावात जोडलेली नाही.
8. अभयारण्याच्या सिमेपासून 10.00 कि.मी. त्रिज्येचा नकाशा जोडण्यांत आलेला नाही.
9. वन्यजीवाच्या संरक्षणाकरीता कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांबाबतचा प्रस्तावात समावेश झालेला नाही.

10. Eco-sensitive Zone क्षेत्राबाबतचा नकाशा जोडलेला नाही.

11. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने बाधीत वनक्षेत्राच्या दुप्पट अवनत वनक्षेत्रात पर्यायी वनीकरण घेणे आवश्यक आहे. तेव्हा त्याअनुषंगाने देण्यांत आलेल्या प्रमाणपत्रात बदल करण्यांत यावा व अवनत वनक्षेत्र प्राप्त करण्याकरीता संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेशी संपर्क करावा.

12. प्रस्तावात जोडण्यांत आलेल्या प्रमाणपत्रामध्ये व इतर किरकोळ दुरूस्त्या असल्याने संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना या कार्यालयात पाठविण्यांत येवून प्रस्तावाची तपासणी करून सुधारणा करण्यांत यावी.

**(सारीका व्यं. जगताप)**
**विभागीय वन अधिकारी (अति.),**
**चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**

**प्रतिलिपी :-** सहाय्यक वनसंरक्षक (सं.अ.), चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. विषयांकीत प्रकरणी संयुक्त मौका तपासणी करून बाधीत होणारे वनक्षेत्र व त्यातील झाडोऱ्याची माहिती संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.), चंद्रपूर / चिचपल्ली यांचेकडून प्राप्त करून या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे अहवाल सादर करावा.

**प्रतिलिपी :-** वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.), चंद्रपूर / चिचपल्ली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. विषयांकीत प्रकरणी यंत्रणेने सुधारीत 43.4405 हे. वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने यंत्रणेसह संयुक्त मौका तपासणी करून बाधीत होणाऱ्या संपूर्ण वनक्षेत्राची खात्री करण्यांत यावी व त्यातील झाडोऱ्याची माहिती या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे सहाय्यक वनसंरक्षक (सं.अ.), चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचेमार्फत सादर करण्यांत यावी. तसेच सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अवनत वनक्षेत्रात दुप्पट पर्यायी वनीकरण प्रस्तावित करावयाचे आहे. तेव्हा पर्यायी वनीकरणाकरीता उपयुक्त अवनत वनक्षेत्राचा शोध घेवून नकाशा व रोपवनाचे अंदाजपत्रकासह माहिती सादर करावी.